# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०५/०८/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक ०४/०७/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल उपविभागात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमी मिळाली की, मोहगाव भदाडे येथे राहणारा तानाजी ढोबळे हा त्याचे मालकीचे शेतात तयार केलेल्या झोपडी परीसरात देशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून पथकाने रेड कारवाई केली असता **आरोपी नामे— तानाजी सिताराम ढोबळे, वय ५८ वर्ष, रा. मोहगाव भडाडे ता. नरखेड** याचे राहते झोपडीची दारूबाबत झडती घेतली असता झोपडीचे समोरील भागातील झूडपीमध्ये पिवळया रंगाचे पिशवीमध्ये २८ निपा देशी दारू प्रत्येकी १८० एम एल च्या ५०४० मिली. प्रत्येकी ७०/—रू. प्रमाणे १९७०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून जप्त मुद्देमाल व आरोपी यास पुढील कायदेशीर कारवाई करीता पोस्टे नरखेड यांच्या ताब्यात देण्यात आले. आरोपीविरूद्ध पोस्टे नरखेड येथे कलम ६५(ई) मदाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनी किशोर शेरकी, पोहवा रोशन काळे, उमेश फुलबेल, शंकर मडावी, नितेश पिपरोदे, पोना विपीन गायधने यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर